|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

**(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव)**

जा.क्र.कबचौउमवि/7-अ/1866/2024 दिनांक: 13/06/2024

प्रती,

1) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक

2) मा.संचालक/विभाग प्रमुख,
शैक्षणिक प्रशाळा,कबचौउमवि,जळगाव,

विषय :-शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेते वेळी त्या-त्या वर्गाच्या दोन्ही सत्रांचे परीक्षा शुल्क व अंतिम वर्षास प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांकडून पदवीप्रमाणपत्र शुल्क घेणेबाबत.

संदर्भ :-1) व्यवस्थापन परिषद ठराव क्र.ए-75/2023 दि.08/05/2023
2) व्यवस्थापन परिषद ठराव क्र.ए-120/2023 दि.08/05/2023
3) जा.क्र.कबचौउमवि//7-अ/2043/2023, दि.01/06/2023

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या संदर्भात कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2023-24 पासून विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेते वेळी त्या-त्या वर्गाच्या दोन्ही सत्राची परीक्षा शुल्क व अंतिम वर्षास प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांकडून पदवीप्रमाणपत्र शुल्क घेण्याबाबत विद्यापीठ अधिकार मंडळाने निर्णय घेतला आहे.

तरी आपणास या पत्राव्दारे कळविण्यात येते की, संदर्भ क्र.3 च्या पत्रासोबत जोडण्यात आलेल्या परीक्षा शुल्कांच्या तक्त्यात अभ्यासक्रम निहाय नमूद केलेले परीक्षा शुल्क व अंतिम वर्षासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांकडून पदवीप्रमाणपत्र शुल्क प्रवेशावेळी महाविद्यालयांनी /परिसंस्थांनी / शैक्षणिक प्रशाळा यांनी प्रवेश शुल्कासोबत आकारणी करुन विद्यार्थ्यांकडून घेण्यात यावी. याबाबत महाविद्यालयाच्या माहिती पुस्तिकामध्ये विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांच्या शुल्कांची माहिती नमूद करण्यात यावी, **महाविद्यालयामार्फत कॉलेज लॉगीन मधून ॲडमीशन फी नोंदणी करते वेळी परीक्षा शुल्क व पदवीप्रदान शुल्काची आकारणी करण्यात येईल. महाविद्यालय/परिसंस्था / शैक्षणिक प्रशाळा यांनी प्रवेश पात्रतेच्या शुल्कासोबत परीक्षा शुल्क एकत्रितरित्या मॅंडेट व्दारे ऑनलाईन विद्यापीठात जमा करावे.**

शैक्षणिक वर्ष 2024-25 मधील प्रवेशित होणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज Online उपलब्ध करुन देण्यात येणार नाहीत. तसेच ते Online इनवर्डसाठी उपलब्ध होणार नाहीत. प्रवेश घेते वेळी विद्यार्थ्यांनी नमूद केलेले विषयांचे हॉल तिकीट उपलब्ध करुन देण्यात येतील. तरी विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक विषयांची निवड करावी. सदर बाब संबंधितांच्या व विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावी. पुनर्परीक्षार्थी (Backlog) विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्जांबाबत वेळापत्रक व फी संदर्भात माहिती स्वतंत्रपणे कळविण्यात येईल, याची कार्यप्रणाली प्रचलित पध्दतीनुसार राहील.

संदर्भिय पत्र क्र.3 च्या पत्रासोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे अभ्यासक्रम निहाय परीक्षा शुल्क व पदवी प्रमाणपत्र शुल्क घेवून सर्व बाबी संबंधितांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व परिपत्रकाप्रमाणे शुल्क घेवून विद्यापीठास पात्रता शुल्कासोबत परीक्षा शुल्क जमा करण्याची कार्यवाही करावी. तसेच एनईपी अंतर्गत प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमासाठी तूर्त परीक्षा शुल्कामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही, वरील प्रमाणे कार्यवाही करुन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,
सही/-
(प्रा.योगेश एन.पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**<u>प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-</u>**

1) मा.कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव 2) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
3) मा.कुलसचिव, कबचौउमवि, जळगाव 4) मा.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
5) परीक्षा संगणक केंद्र, कबचौउमवि, जळगाव 6) जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव 7) उप/सहा.कुलसचिव / कक्ष अधिकारी परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग (सर्व) 8) ई-सुविधा केंद्र, कबचौउमवि, जळगाव.